क्रमांक : १४५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२ /अग्रहायण १०, १९४४ (शके)**

### १४५. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. तसेच, प्रलंबित ५४ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १२ निवेदने गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ४२ निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३२ निवेदनांपैकी ५ निवेदने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित २७ निवेदनांपैकी १ निवेदने सोमवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आले आहेत. आता एकूण २६ निवेदनांपैकी ७ निवेदन शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १ डिसेंबर, २०२२.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्र. ५४**

सर्वश्री. धर्मरावबाबा आत्राम, मोहन मते, दिपक चव्हाण, चेतन तुपे, मनोहर चंद्रिकापूरे व समिर मेघे, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५४ पुढीलप्रमाणे आहे.

---

" नागपूर येथील मेयो रुग्णालयातील कर्मचा-यांच्या पगारासाठी रुग्णालयांलयास रुपये ३.५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असणे, तथापि रुग्णालय प्रशासनाकडून शासनास सादर करण्यांत येणा-या विनंतीपत्रात ३.५ कोटी ऐवजी रुपये ३५,६३,४००००/- इतकी मागणी एक शुन्य जादा टाकून नोंदविण्यात आल्याचे निदर्शानास येणे, शासनानेदेखील त्याबाबत काहीही शहानिशा न करतां नोंदणीपत्रातील सर्वच्यासर्व रक्कम रु. ३५ कोटी ६३ लाख इतकी रक्कम मेयो रुग्णालय प्रशासनास वितरित करण्यांत आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, दरम्यानच्या काळात रुग्णालय प्रशानास आपली चूक लक्षांत आल्यावर जादा आलेली अतिरिक्त रक्कम शासनास परत घेण्याची विनंती करण्यात येणे, परंतु शासनाने अतिरिक्त सर्व रक्कम परत घेण्याऐवजी त्या रक्कमेपैंकी फक्त १० कोटी ४३ लाख इतकीच रक्कम परत घेण्यांत येणे, त्यामुळे उर्वरित २२ कोटी रक्कमेबाबत काय झाले असा प्रश्न निर्माण होऊन त्यामध्ये आर्थिक घोटाळा झाला आहे की काय, असा अधिकारी/कर्मचारी वर्गामध्ये संभ्रम होणे, परिणामी या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन**

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात रुपये १.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला. तथापि सदर निधी अपुरा असल्याने, सन २०२१ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रुपये ३४.६३ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला. त्यानुसार सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रुपये ३५.६३ कोटी एंवढा निधी मंजूर करण्यात आला. सदर संस्थेस अतिरिक्त निधी मंजूर झाल्याबाबत संचालनालयाने उक्त अतिरिक्त निधी अन्य संस्थांना त्यांच्या मागणीनुसार पुनर्विनियोजन करण्याचा प्रस्ताव सादर केला असता, शासनाने दिनांक २०.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण ६ संस्थाना रु. १०.४३ कोटी एवढा निधी वित्त विभागाच्या मान्यतेने पुनर्विनियोजनाद्वारे वळती केला. तसेच उर्वरित रक्कम रुपये २५.२० कोटी ही रक्कम सुधारित अंदाज सन २०२१-२०२२ नुसार वित्त विभागाने कमी करुन रुपये ६.२० कोटी एवढी केली. तथापि, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात एकूण मंजूर निधीपैकी रुपये ३.०२ कोटी एवढाच निधी वितरित करण्यात आला असल्याने यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक घोटाळा झालेला नाही.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेकडून चुकीची पुरवणी मागणी सादर करण्यात आल्याबाबत संचालनालयाने दिनांक ०५.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असता, अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी केलेल्या खुलाश्यात सदर मागणी ही चुकीच्या टंकलेखनामुळे झाली असून, सदर जास्तीची मागणी वेगळ्या कोणत्याही प्रयोजनार्थ सादर केलेली नाही. तसेच भविष्यात अशा प्रकारची मागणी करतांना योग्य ती तपासणी व खात्री करुन सादर करण्याबाबत सक्त ताकिद संबंधितांना देण्यात आल्याबाबत नमुद केले आहे.

**************

RoTA H-602 (700-10-2022)

लक्षवेधी सूचना क्रमांक ७०३

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. श्रीनिवास वनगा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

---

"मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) कोशिमशेत या गावातील सर्वेश अशोक धोडी या १६ महिन्याचा मुलाला दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वाशाळा येथील परिचारीकेने मुलाच्या घरी जाऊन एमआर व ट्रिपल बुस्टर डोस दिल्यानंतर त्याचा दिनांक रोजी झालेला मृत्यू, आरोग्य विभागाच्या बेफिकीरीमुळे मुलाचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप, याप्रकरणी शासनाने तात्काळ चौकशी करून मृत्युस कारणीभूत असलेल्या परिचारीका व जबाबदार असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**<u>मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन</u>**

पालघर जिल्ह्यातील कु. सर्वेश अशोक धोडी वय वर्षे १६ राहणार कोशिमशेत गावठाण ता. मोखाडा याला दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२ रोजी अंगणवाडी कोशिमशेत गावठाण येथील लसीकरण सत्राच्या ठिकाणी डिपीटी बुस्टर, एमआर-२, ओरल पोलिओ बुस्टर व जीवनसत्व अ-२ हे डोस देण्यात आले. सदर लसीकरणाच्या दिवशी काही वेळा नंतर बालकास सौम्य ताप आला होता. दिनांक १०.०२.२०२२ रोजी सदर बालकाचा ताप कमी झाला होता. दिनांक ११.०२.२०२२ रोजी बालकास पुन्हा ताप आला होता व तरी दिनांक १२.०२.२०२२ रोजी बालकास पालकांनी खोडाळा येथील खाजगी वैद्यकीय व्यावसायीक यांच्या खाजगी दवाखान्यात उपचारासाठी घेवून गेले. खाजगी वैद्यकीय व्यावसायीक यांनी बालकास तोंडातून प्यावयाचे औषध दिले होते. त्या दिवशी पूर्ण दिवसभरात बालकाने काहीही अन्नग्रहण केले नव्हते. परंतु दवाखान्यातून घरी जाताना रस्त्यात गाडीत थोडे केळ खाल्ले होते. घरी आल्यावर सदर बालकास पालकांनी झोळीत ठेवले असता अचानक बालकास आकडी येण्यास सुरुवात झाल्यामुळे पालकांनी बालकास ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथे नेले असता बालकाचा दिनांक १२ फेब्रूवारी २०२२ रोजी दुपारी ०३.२५ वाजता मृत्यू रस्त्यात झाला. वैद्यकीय अधिकारी,ग्रामीण रुग्णालय, मोखाडा जि.पालघर यांनी सदर बालकास मृत घोषीत केले. सदर बालकाचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालय , मोखाडा येथे करण्यात आले . मयताचे मृत्यूचे नक्की कारण समजुन येण्यासाठी व्हिसेरा तपासणीसाठी राखून ठेवण्यात आलेला आहे.

मृत्यूबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक दिनांक १५ मार्च,२०२२ रोजी घेण्यात येऊन चौकशी करण्यात आली. चौकशी समितीच्या इतिवृतानुसार सदर बालकास वापरण्यात आलेल्या लसी डिपीटी, एमआर,ओरल पोलिओ व जीवनसत्व अ लसीकरण सत्राच्या वेळी इतर बालकांनाही वापरण्यात आली होती. तसेच सत्राच्या वेळी वापरण्यात आलेल्या बॅचेसची लस जिल्हयातील इतर लसीकरण सत्राला वापरण्यात आले असून लस दिल्यानंतर कुठल्याही अनपेक्षित घटनेची नोंद जिल्हयात झालेली नाही. सदर मृत्यू संभाव्य कारण Aspiration Pneumonitis due to convulsion आहे. व्हिसेरा अहवाल प्राप्त झाल्यानंतर बालकाच्या मृत्यूचे कारण निश्चित करण्यात येईल.

****************************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र. ६५**

सर्वश्री. धर्मरावबाबा आत्राम, मोहन मते, दिपक चव्हाण, चेतन तुपे, मनोहर चंद्रिकापूरे व समिर मेघे, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६५ पुढीलप्रमाणे आहे.

---

" नागपूर येथील मेयो रुग्णालयातील कर्मचा-यांच्या पगारासाठी रुग्णालयांलयास रुपये ३.५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असणे, तथापि रुग्णालय प्रशासनाकडून शासनास सादर करण्यांत येणा-या विनंतीपत्रात ३.५ कोटी ऐवजी रुपये ३५,६३,४००००/- इतकी मागणी एक शुन्य जादा टाकून नोंदविण्यात आल्याचे निदर्शानास येणे, शासनानेदेखील त्याबाबत काहीही शहानिशा न करतां नोंदणीपत्रातील सर्वच्यासर्व रक्कम रु. ३५ कोटी ६३ लाख इतकी रक्कम मेयो रुग्णालय प्रशासनास वितरित करण्यांत आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, दरम्यानच्या काळात रुग्णालय प्रशानास आपली चूक लक्षांत आल्यावर जादा आलेली अतिरिक्त रक्कम शासनास परत घेण्याची विनंती करण्यात येणे, परंतु शासनाने अतिरिक्त सर्व रक्कम परत घेण्याऐवजी त्या रक्कमेपैंकी फक्त १० कोटी ४३ लाख इतकीच रक्कम परत घेण्यांत येणे, त्यामुळे उर्वरित २२ कोटी रक्कमेबाबत काय झाले असा प्रश्न निर्माण होऊन त्यामध्ये आर्थिक घोटाळा झाला आहे की काय, असा अधिकारी/कर्मचारी वर्गामध्ये संभ्रम होणे, परिणामी या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन**

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात रुपये १.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला. तथापि सदर निधी अपुरा असल्याने, सन २०२१ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रुपये ३४.६३ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला. त्यानुसार सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रुपये ३५.६३ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला. सदर संस्थेस अतिरिक्त निधी मंजूर झाल्याबाबत संचालनालयाने उक्त अतिरिक्त निधी अन्य संस्थांना त्यांच्या मागणीनुसार पुनर्विनियोजन करण्याचा प्रस्ताव सादर केला असता, शासनाने दिनांक २०.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण ६ संस्थाना रु. १०.४३ कोटी एवढा निधी वित्त विभागाच्या मान्यतेने पुनर्विनियोजनाद्वारे वळती केला. तसेच उर्वरित रक्कम रुपये २५.२० कोटी ही रक्कम सुधारित अंदाज सन २०२१-२०२२ नुसार वित्त विभागाने कमी करुन रुपये ६.२० कोटी एवढी केली. तथापि, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात एकूण मंजूर निधीपैकी रुपये ३.०२ कोटी एवढाच निधी वितरित करण्यात आला असल्याने यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक घोटाळा झालेला नाही.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेकडून चुकीची पुरवणी मागणी सादर करण्यात आल्याबाबत संचालनालयाने दिनांक ०५.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असता, अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी केलेल्या खुलाश्यात सदर मागणी ही चुकीच्या टंकलेखनामुळे झाली असून, सदर जास्तीची मागणी वेगळ्या कोणत्याही प्रयोजनार्थ सादर केलेली नाही. तसेच भविष्यात अशा प्रकारची मागणी करतांना योग्य ती तपासणी व खात्री करुन सादर करण्याबाबत सक्त ताकिद संबंधितांना देण्यात आल्याबाबत नमुद केले आहे.

**************

<u>लक्षवेधी सूचना क्र.८०</u>

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा. डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत पाडाळणे (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील (शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३९/ऊर्जा-५, दि.१९ सप्टेंबर, २०१९) नवीन ३३ के.व्ही उपकेंद्र स्थापन करण्यात दि.१९ सप्टेंबर, २०१९ रोजी मान्यता देण्यात येणे, यासाठी शासनाने निधीची व्यवस्थासुध्दा करणे, परंतु या योजनेसाठी निधी अद्यापही प्रत्यक्षात देण्यांत न येणे, अद्याप विद्युत केंद्र सुरु न केल्यामुळे तेथील नागरिकांना सुमारे ४० कि.मी. अंतरावरील दुसऱ्या विद्युत केंद्रावरुन अतिरिक्त विद्युत कनेक्शन जोडण्याची आलेली पाळी, तथापी त्या विद्युत केंद्रातुन पुरविण्यात येणाऱ्या वीजपुरवठयांमध्ये वारवार वीज खंडीत होण्याचे प्रकार, त्यामुळे पिण्याचे पाणी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यास निर्माण झालेल्या अनेक अडचणी, त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, मौ.पाडाळणे व मवेशी येथील नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या ३३ के.व्ही.उपकेंद्र स्थापन करण्याचा निधी मिळण्याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री व मा. आदिवसी विकास राज्यमंत्री यांना लेखी पत्राने विनंती करुनही अद्याप काम मार्गी न लागणे, तरी या ३३ के.व्ही. मवेशी व पाडाळणे उपकेंद्रास निधी प्राप्त होणार का आणि किती दिवसाने होणार."

<u>मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन</u>

महावितरणने अहमदनगर जिल्ह्यातील मवेशी व पाडाळणे या आदिवासी व दुर्गम भागामध्ये आदिवासी उपयोजना अंतर्गत नवीन ३३/११ के. व्ही. उपकेंद्र उभारणी करीता प्रस्ताव सादर केला होता. शासनाने मवेशीसाठी रू. ३.८७ कोटी व पाडाळणे साठी रू.२.९२ कोटी असे एकूण रू. ६.७९ कोटी इतके अनुदान आदिवासी उपयोजने अंतर्गत उपकेंद्रांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दि.१९.०९.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. उपकेंद्र उभारणी करीता लागणाऱ्या जागेची संपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. निधीची मागणी आदिवासी विकास विभागाकडे करण्यात आली असून तो महावितरण कंपनीस उपलब्ध करून निविदा प्रक्रिया पूर्ण करून उपकेंद्राचे काम हाती घेण्यात येईल.

३३/११ के. व्ही. कोतुळ उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. अबीत खिंड कृषी वाहिनी काही वेळेस अतिभारीत झाल्यास या वाहनीवरील अंबीत खिंड फाटा तात्पुरता बंद करून उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. प्रस्तावित पाडाळणे उपकेंद्रास येणाऱ्या वाहिनीची लांबी अंदाजे २४ कि.मी. आहे. प्रस्तावित पाडाळणे उपकेंद्र झाल्यानंतर संबंधित परिसराला विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिनीची लांबी १२ कि.मी. होणार असून त्यामुळे वीजेच्या अतिभारामुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होऊन पिण्याचे पाणी व शेतीसाठी पाणीपुरवठ्यातील वीजेच्या अडचणी दूर होण्यास मदत होईल.

**************************

लक्षवेधी सूचना क्र.८२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"परंतु अकोले तालुक्यात शेती पंपांना ठिकाणी २ तास ४ तास शेतीपंपासाठी वीज पुरवठा होणे त्यातही सातत्यपूर्ण विद्युत खंडीत होणे, बऱ्याच ठिकाणी दिवसाआड विद्युत पुरवठा होणे त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात हाल होणे, शेतकऱ्यांचा प्रचंड असंतोष वाढणे, वीज वितरण कार्यालयावर मोर्चे नेणे, जळालेली रोहित्रे १-१ महिना न मिळणे, ही अकोले विधानसभा क्षेत्रातील वीज वितरणातील अवस्था दिसते आहे, तरी ही अवस्था सुधारणार का आणि किती दिवसांमध्ये सुधारणार या परिस्थितीला जबाबदार कोण त्या संबंधितांवर कारवाई होणार काय."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार संपुर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८/१० तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पद्धतीने देण्यात येतो. त्यानूसार सद्यस्थितीत, संपुर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

अकोले तालुक्यात ३३/११ के.व्ही. क्षमतेचे एकुण १४ उपकेंद्र असुन त्यावरील ११ केव्ही क्षमतेच्या एकूण ७६ विद्युत वाहिन्यांव्दारे वीज पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत, त्यापैकी प्रामुख्याने खालील ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होण्याच्या तक्रारीचे प्रमाण अधिक आहे.

१) ३३/११ के.व्ही. केळी उपकेंद्रामधुन निघणारी ११ केव्ही एकदरा कृषी वाहिनी ही डिसेंबर ते मे या कालावधीत काही वेळेस अतिभारीत होत असल्यामुळे सांगवी फाटा बंद करुन एकदरा व खिरव्हिरे भाग यांना महत्तम मागणीच्या कालावधीत एक दिवसा आड विद्युत पुरवठा देण्यात येत आहे. सदर ठिकाणी उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत नवीन ३३/११ के.व्ही. (१ x ५ एम.व्ही.ए.) खिरव्हिरे उपकेंद्र मंजुर असुन सदरहु कामाचा कार्यादेश दि. ०८.०७.२०२१ रोजी दिलेला असुन कार्यपुर्ती दि. ०७.११.२०२२ असा आहे.

२) ३३/११ के.व्ही. समशेरपुर उपकेंद्रामधुन निघणारी ११ के.व्ही. देवठाण कृषी वाहिनी व ११ के.व्ही. गणेशखिंड कृषी वाहिनी कृषी हंगामात महत्तम मागणीच्या कालावधीत काही वेळेस अतिभारीत होत असल्यामुळे सदर वाहिनीवर अशा वेळेस काही भाग बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे देवठाण येथे उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र (१ x ५ एम.व्ही.ए.) मंजुर असुन सदरहु कामाचा कार्यादेश दि. ०८.०७.२०२१ रोजी दिलेला असुन कार्यपुर्ती दि. ०७.११.२०२२ असा आहे.

३) ३३/११ के.व्ही. अकोले उपकेंद्रामधुन निघणारी ११ के.व्ही. इंदुरी कृषी वाहिनी ही अतिभारीत होत असल्यामुळे सदर वाहिनीवर अशा वेळेस काही भाग बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. ३३/११ के.व्ही. अंबड उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ११ के.व्ही. मेहेंदुरी व ११ के.व्ही. इंदुरी कृषी वाहिनी अतिभारीत झाल्यास अशा वेळेस काही भाग बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. सदर ठिकाणी ३३/११ के.व्ही. अंबड उपकेंद्रामध्ये ५ एम.व्ही.ए. रोहित्राची क्षमता १० एम.व्ही.ए. करण्यासाठी “कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२०” अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे. कृषी आकस्मित निधीच्या उपलब्धततेनुसार व तांत्रिक प्राधान्य क्रमानुसार सदर कामे करण्याचे नियोजित आहे.

४) ३३/११ के.व्ही. वाघापुर उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ११ के.व्ही. वाघापुर व ११ के.व्ही. पिंपळगाव खांड या वाहिन्या फेब्रुवारी ते एप्रिल या महिन्यात काही वेळेस अतिभारीत होत असल्यामुळे सदर वाहिन्यांवर अशा वेळेस काही भाग बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. ३३/११ के.व्ही. कोतुळ उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ११ के.व्ही. धामणगाव पाट कृषी वाहिनी अतिभारीत होत असल्यामुळे त्या वाहिनीवरील पातळी, मोग्रस, बहार फाटा क्रमाक्रमाने बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच ११ के.व्ही. अंभोळ कृषी वाहिनी काही वेळेस अतिभारीत झाल्यास या वाहिनीवरील घुलेवाडी फाटा व पाडळणे फाटा क्रमाक्रमाने बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. ३३/११ के.व्ही. कोतुळ उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ११ के.व्ही. अबीत खिंड कृषी वाहिनी काही वेळेस अतिभारीत झाल्यास या वाहिनीवरील अंबीत खिंड फाटा बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. सदर ठिकाणी "पाडळणे " येथे ३३/११ के.व्ही. (१ x ५ एम.व्ही.ए.) क्षमतेचे उपकेंद्र आदिवासी उपयोजने अंतर्गत मंजुर असुन निधी उपलब्ध होताच प्राधान्याने पाडळणे उपकेंद्राच्या कामास सुरुवात करण्याचे नियोजित आहे.

५) ३३/११ के.व्ही. राजुर उपकेंद्रामधुन निघणारी ११ के.व्ही. पिंपळगाव नाकविंदा कृषी वाहिनी अतिभारीत होत असल्यामुळे या वाहिनीवरील शेरणखेल, दिगंबर, धरणफाटा, पिंपळगाव नाकविंदा हे फाटे क्रमाक्रमाने बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. ३३/११ केव्ही राजुर उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ११ के.व्ही. अंबीत व ११ के.व्ही. शिरपुंजे कृषी वाहिनी अतिभारीत झाल्यास काही भाग बंद करुन उर्वरित भागास वीज पुरवठा करण्यात येतो. सदर ठिकाणी "मावेशी " येथे ३३/११ के.व्ही. (१ x ५ एम.व्ही.ए.) क्षमतेचे उपकेंद्र आदिवासी उपयोजने अंतर्गत मंजुर असुन निधी उपलब्ध होताच प्राधान्याने मावेशी उपकेंद्राच्या कामास सुरुवात करण्यात येईल. नजीकच्या कालावधीत अकोले तालुक्यातील वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा वारंवार खंडीत होणे किंवा विस्कळीत होणे या कारणास्तव वीज वितरण कार्यालयावर कोणताही मोर्चा आलेला नाही. अकोले तालुक्यात सन २०२१-२२ (दि. ०१.०४.२०२१ ते दि. २१.०३.२०२२) मध्ये एकुण ३२८ थ्री फेज वितरण रोहित्रे नादुरूस्त झालेली असून त्यापैकी २८९ वितरण रोहित्रे बदलण्यात आली आहेत. उर्वरीत रोहित्रे बलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

*************************

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" महाराष्ट्र राज्याच्या ऊर्जा विभागाअंतर्गत शासनाच्या मालकीच्या महानिर्मिती कंपनीमध्ये सन २०१४-२०१९ हया कालावधीतील सर्व स्थापत्य बांधकामे, सुरक्षा व संचालन विभागातील कार्यकारी, पर्यवेक्षीय ते नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मे. B.G.R. Energy System या कंपनीस मंत्रालयीन स्तरावरील अधिकारी, शासकीय कंपनीचे व तत्कालीन शासनाने संगनमताने केलेल्या ५७७० कोटी रुपये भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येणे, त्याप्रकरणी चौकशी करुन शासनाच्या सुधारित दरानुसार बुडविलेल्या स्वामित्व धनाच्या रक्कमेची वसुली करुन भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करणे, चंद्रपूर, औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये सन २०१४-२०१९ हया कालावधीत सुमारे ३५०० कोटी रुपयाचे नुकसान होणे, प्रकल्प उभारणीच्या काळात सिव्हील कामाच्या ड्रॉईंगनुसार रॉयल्टी क्लेअरंसमध्ये १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल बुडविण्यात येणे, मे. B.G.R. Energy System या कंपनीने उभारणीच्या कामात तत्कालिन सिव्हीलचे मुख्य अभियंता व संचालक, संचलन व इतर यंत्रणांनी कंत्राटदार कंपनीच्या लोकांच्या हितांची जोपासना करुन सुमारे ५०० कोटी रुपयांची कामे वाढवून दाखविल्याचे C.V.C. किंवा गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी तसेच शासनाच्या महावितरण व महापारेषण या दोन्ही कंपन्यांमध्ये नेमण्यात आलेल्या संचालक, संचलन/मानव संसाधन प्रकल्प तसेच शासनाच्या महानिर्मिती कंपनीमध्ये नेमण्यात येणे, याबाबत जनतेमध्ये व विविध संघटनांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व तीव्र प्रतिक्रिया, तसेच विविध कामगार संघटनांनी केलेली निदर्शने तसेच संचालक संचलन, महावितरण या पूर्वीच्या पदावरील बाबी न्यायप्रविष्ठ असतांना त्यांच्या पुर्वनियुक्त्या करणे, महापारेषण कंपनीमध्ये (MSTCL- SP/T-०८०२/०२३१) थर्मल विजन कॅमेरा इ. सारख्या निविदा प्रक्रियेमध्ये विसंगती असलेल्या कंपन्यांना काम देणे, खापरखेडा, चंद्रपूर व इतरही महाऔष्णिक केंद्रामध्ये वारंवार आगी लागणे त्यासाठी संचालक संचलन जबाबदार असणे, सदर संचालक Chief Fire Officer यांचे न ऐकता स्वत:च्या अधिकारात मनमानी करणे तसेच कार्यकारी संचालक पारेषण असतांना गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असतांना ठराविक संघटनांच्या फायद्यासाठी त्याचीच पुन्हा महापारेषणच्या संचालक मानव संसाधन पदावर नेमणूक करणे, व मुख्य अभियंता औष्णिक प्रकल्प खापरखेडा, चंद्रपूर, कोराडी, भुसावळ, पारस, परळी, नाशिक इत्यादी प्रकल्पांमध्ये केलेल्या गैरप्रकारास कंपन्यांचे संचालक तसेच शासनाचे अधिकारी संगनमताने पाठीशी घालत असणे, इत्यादी बाबतीत शासनाचे होणारे दुर्लक्ष, त्यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महानिर्मिती कंपनीकडून प्राप्त माहितीनुसार, चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील २x५०० मे. वॅटचे संच क्र. ८ व ९ या प्रकल्पाच्या एकूण खर्च रु. ५५०० कोटी (IDC सहित) यास शासन निर्णय क्र. प्रकल्प-२००७/प्र.क्र.११०६/उर्जा-४, दि.०५.०३.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्पाची मूळ अंदाजित किंमत ही सन २००७ च्या विस्तृत प्रकल्प अहवालानुसार (DPR) होती. त्या

अनुषंगाने, मुख्य संयंत्र उभारणीकरिता मे. भेल व उर्वरित संयंत्र उभारणीकरिता मे. बी. जी. आर. यांना अनुक्रमे दि. ०९.०२.२००९ व दि. १२.०६.२००९ रोजी EPC तत्वावर कार्यादेश देण्यात आले होते.

सदर प्रकल्पाच्या उभारणीकरिता मुख्य संयंत्र, उर्वरित संयंत्र आणि या व्यतिरिक्त कामांचे कंत्राट यांच्या price variation व Taxes सहित अंतिम किंमतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| | | |
|---|---|---|
| मुख्य संयंत्र कंत्राटाची किंमत: (मे. भेल) | : | रु. ३१२५.३७ कोटी |
| उर्वरित संयंत्र कंत्राटाची किंमत: (मे. बी. जी. आर.) | : | रु. १९५१.६९ कोटी |
| या व्यतिरिक्त कामांचे कंत्राटाची किंमत | : | रु. २५०.२३ कोटी |
| एकूण कंत्राटांची किंमत | : | रु. ५३२७.२९ कोटी |

संच क्र. ८ च्या प्रकल्प पूर्णत्वाची निर्धारित तारीख दि. ०८.०७.२०१२ व संच क्र. ९ च्या प्रकल्प पूर्णत्वाची निर्धारित तारीख दि. ०८.१०.२०१२ अशी होती. तथापि, सदर संचांचे काम पूर्ण होऊन संच क्र. ८ व संच क्र. ९ चे व्यावसायिक संचलन (COD-Commercial Operation Date) अनुक्रमे दि. ०४.०६.२०१६ व दि.२४.११.२०१६ रोजी झाले आहे. मुळ अंदाजित प्रकल्प किमतीपेक्षा प्रामुख्याने बांधकाम काळातील व्याजात झालेली वाढीमुळे प्रकल्पाच्या किमतीत वाढ झालेली आहे. तसेच, कंत्राटदाराकडून संयंत्र व इतर सामुग्रीचा असुरळीत व विलंबाने पुरवठा, कामासाठी अपुऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा, संच उभारणी दरम्यान काही संयंत्रात झालेल्या बिघाडामुळे पुन:श्च करावे लागलेले काम, पाण्याचा दुष्काळ इत्यादीमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास मुख्यत्वे विलंब झाला. प्रकल्प पूर्ण होण्यात झालेल्या विलंबाचे विश्लेषन करण्यासाठी त्रयस्थ संस्थेची नेमणूक करण्यात आली असून संस्थेकडून विलंब विश्लेषन अहवाल प्रतिक्षेत आहे. कंत्राटाच्या अटी व शर्ती नुसार मुख्य संयंत्र कंत्राटासाठी रु.३०१.७१ कोटी व उर्वरीत संयंत्र कंत्राटासाठी रु. २११.६३ कोटी एवढी निर्धारित नुकसान भरपाई लागू होऊ शकते. तथापि, मुख्य संयंत्र कंत्राटासाठी मे. भेल यांची बँक हमी व रोख रक्कम मिळून एकूण रु. ३०४.९५ कोटी व उर्वरीत संयंत्र कंत्राटासाठी मे. बी.जी. आर. यांची बँक हमी व रोख रक्कम मिळून एकूण रु. २२३.७८ कोटी इतकी रक्कम महानिर्मितीने राखून ठेवली आहे. सदर प्रकल्पाच्या सुधारित अंदाजित किंमत रु. ७९३६.३३ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५२५/उर्जा-४, दि.२०.०२.२०१८ अन्वये मान्यता मिळाली असून सदर प्रकल्पावर झालेला एकूण खर्च रु. ७३३४.४८ कोटी इतका आहे.

सदर प्रकल्पाकरिता मे.बी.जी.आर.एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. या कंपनीस स्थापत्य बांधकामाचा व स्थापत्य बांधकाम साहित्य पुरविण्याचा कार्यादेश देण्यात आला. प्रकल्प उभारणीच्या काळात रॉयल्टी क्लिअरन्स पोटीची थकीत रक्कम १०० कोटी नसून स्वामित्वधन (Royalty) रक्कम रु. २.४२ कोटी इतकी आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांनी दि. ०२.०२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार असे कळविले आहे की, प्रकल्पाच्या बांधकामासाठी वापरलेल्या गौण खनिजापैकी ९६८३७.६६ ब्रास परिमाणाचे थकीत स्वामित्वधन रक्कम रु. २.४२ कोटी आणि मागील ०६ वर्षाचे व्याज, इतर देयके, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, TCS रक्कम यासहीत एकूण रक्कम रु. ५.१४ कोटी मे. बी.जी.आर. कंपनीने दोन महिन्याच्या आत शासनाकडे जमा करावी व तसे न केल्यास त्यांच्या सुरक्षा ठेव रक्कमेतून सदर रक्कम कपात करुन महानिर्मिती कंपनीने शासनाकडे एक महिन्याच्या आत जमा करावी. सदर आदेशानुसार मे.बी.जी.आर. कंपनीस कळविण्यात आले होते. तथापि, मे. बी.जी.आर. कंपनीस थकीत स्वामित्वधनाची रक्कम मान्य नसल्याने, त्यांनी अतिरिक्त आयुक्त, नागपूर यांच्याकडे दि. ०५.०५.२०२२ रोजी अपील सादर केले आहे.

H/616-19

स्वामित्वधनापोटी योग्य ती आवश्यक रक्कम महानिर्मितीने मे. बी.जी.आर. यांच्या देयकातून राखून ठेवली आहे.

मे. बी. जी. आर. एनर्जी सिस्टीम्स प्रा. लि. यांना सुमारे ५०० कोटी रुपयांची कामे वाढवून दिलेली नसून सदर प्रकल्पामध्ये मे. बी. जी. आर. यांना कंत्राटामध्ये समाविष्ट नसलेली परंतु, प्रकल्प पूर्णत्वासाठी आवश्यक असलेली रु.७.२८ कोटीची इतर कामे करावी लागली व त्यास महानिर्मितीच्या संचालक मंडळाने, मंडळ निर्णय क्र.१८०.२४ दि.२२.०६.२०१८ नुसार मान्यता दिली आहे. सदर कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. बॉयलर, मिल, बंकर व टर्बाइन इत्यादींच्या जोत्याची खोली वाढल्यामुळे : रु. ६.२० कोटी

२. सन २०१० मध्ये दुष्काळादरम्यान उन्हाळयामध्ये टँकरव्दारे बांधकाम पाणीपुरवठा: रु. ०.०३ कोटी

३. ऑइल व पाणीपुरवठा पाईप लाइनसाठी रेल्वे रुळाखालुन कलवर्टचे बांधकाम : रु. १.०५ कोटी

एकूण : रु. ७.२८ कोटी

महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या उप कंपन्यांच्या Articles of Associations मधील Articles ७७ अनुसार या उपकंपन्यांच्या संचालकांची निवड करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्यादित कडे आहेत. या नियुक्त्या करण्यासाठी संचालक मंडळाच्या ठरावानुसार शोध समिती गठीत करण्यात आली आहे. सदर शोध समितीच्या शिफारशीच्या आधारे सदरहू उप कंपन्यांच्या संचालकांची निवड नियमानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने करण्यात आली.

संचालक (मानव संसाधन), महावितरण या पदाकरिता जाहिरात क्र. ०४/२०२० व ०२/२०२१ यास अनुसरुन सादर केलेलया अर्जांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या शोध समितीच्या शिफारशीनुसार संचालक (मानव संसाधन), महावितरण यांची निवड करण्यात आली.

संचालक (मानव संसाधन), महापारेषण या पदाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळ यांनी मंजूर केलेल्या ठराव क्र.९४६/२०२१ अन्वये संचालक (मानव संसाधन), महापारेषण या पदाच्या जाहिरातीच्या वेळेस अथवा या पदावर नियुक्तीपुर्वी संबंधीतांविरुध्द कोणतेही शिस्तभंगविषयक कार्यवाही किंवा कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नसल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या शोध समितीच्या शिफारशीनुसार संचालक (मानव संसाधन), महापारेषण यांची निवड करण्यात आली.

संचालक (संचलन), महानिर्मिती या पदाकरिता महानिर्मिती कंपनीच्या Articles of Associations मधील Articles ७८ (D) मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीतर्फे जानेवारी, २०१९, जुलै, २०२० आणि डिसेंबर, २०२० मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीत पुर्वआवशक्यता व पुर्वानुभव नमूद करण्यात आला होता. त्याप्रमाणे, खासगी क्षेत्रातील कंपनीत कार्यरत उमेदवारांचा अनुभव देखील ग्राहय धरण्यात येत असून त्याप्रमाणे अटी व शर्तींच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या शोध समितीच्या शिफारशीनुसार संचालक (संचलन), महानिर्मिती यांची निवड करण्यात आली.

संचालक (संचलन), महापारेषण या पदाकरिता माहे मे-२०२१ मधील जाहिरातीत संचालक (संचलन) या पदाकरिता आवश्यक असलेली पुर्वआवशक्यता नमूद करण्यात आली होती. त्याअनुषंगाने या पदाकरिता एकूण १४ उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीकरिता पात्र ठरविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या शोध समितीच्या शिफारशीनुसार संचालक (संचलन), महापारेषण यांची निवड करण्यात आली.

संचालक (संचलन), महावितरण या पदाकरिता संचालक (संचलन) यांनी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीतर्फे त्यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या शिस्तभंग विषयक कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | प्रकरणाचा संक्षिप्त तपशिल | अंतिम शिक्षा आदेश | प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय | द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | उप संचालक (दक्षता), कल्याण यांनी माणिकपूर पोलीस स्टेशन येथे नोंदविलेले प्रथम खबर अहवाल क्र. २४९/२०१० प्रकरण. | -- | -- | | मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, वसई येथे फौजदारी प्रकरण क्र.१३००६६७/२०११ न्यायप्रविष्ठ आहे. |

संचालक (संचलन), हे अधिक्षक अभियंता म्हणून वसई येथे कार्यरत असतांना त्यांच्याविरुध्द माणिकपूर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता कलम २१७, २१८ अंतर्गत प्रथम खबर अहवाल क्र. २४९/२०१० नोंद झालेला आहे. सदरहू प्रकरण हे मा. न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग), वसई यांचेकडे प्रलंबित असून मा. न्यायालयाने त्यांना आजतागायत समन्सची बजावणी केलेली नाही.

त्याचप्रमाणे संचालक (संचलन), यांनी त्यांच्याविरुध्द माणिकपूर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता २१७, २१८ अंतर्गत नोंद असलेल्या प्रथम खबर अहवाल क्र. २४९/२०१० रद्द करणेकरीता मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या याचिकेमध्ये खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

I. To quash and set aside the Chargesheet in R.C.S. No. 667 of 2011 pending before Ld. JMFC, Vasai in F.I.R. No. 249 of 2010 register under section 217 and 218 of IPC in Manikpur Polic Station, Vasai, Palghar against the applicant.

II. To stay the proceedings in R.C.S. No. 667 of 2011 pending before Ld. JMFC, Vasai in F.I.R. No. 249 of 2010 register under section 217 and 218 of IPC in Manikpur Polic Station, Vasai, Palghar till pendency of the above said application.

संचालक (संचलन), यांनी केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशाद्वारे "II" अन्वये केलेली विनंती मान्य करुन याप्रकरणी ad-interim relief/ स्थगन आदेश दि. १६.०२.२०२१ रोजी निर्गमित केला आहे.

सबब, संचालक (संचलन), महावितरण या पदाच्या जाहिरातीच्या वेळेस संचालक (संचलन), यांना कोणत्याही फौजदारी प्रकरणात दोषी ठरविण्यात आल्याचे निदर्शनास येत नाही. परिणामत: महावितरण कंपनीच्या Articles of Association क्र. ८४ तसेच मा. शोध समितीमार्फत पार पडलेल्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेत प्राप्त गुणांनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाची रितसर मंजुरी घेऊन त्यांची संचालक (संचलन), महावितरण या पदी निवड करण्यात आलेली आहे.

महापारेषणच्या मध्यवर्ती खरेदी संस्थेव्दारा ५० थर्मोव्हिजन कॅमेरा खरेदीकरिता दि. २७.०४.२०२१ रोजी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेतील एल-१ निविदा धारक म्हणजे मे. तोष्णीवाल इंडस्ट्रीज प्रा.लि. यांनी यापूर्वी अशाप्रकारचे उपकरण इतर राज्यामध्ये वा महापारेषणमध्ये पुरवठा केलेल्या उपकरणाचा समाधानकारक सेवेचा दाखला जोडला नव्हता, त्यामुळे निविदेतील १९.०(ii)(a) पात्रता निकष (प्रायोगिक तत्वावरील कार्यादेश- Trial Order) नुसार एकूण मागणीच्या २०% कॅमेरे म्हणजेच १० कॅमेरे पुरवठा करण्याबाबत त्यांना आदेश देण्यात आले. एल-२ निविदाधारक म्हणजेच मे. टेस्टो इंडिया प्रा.लि. यांनी एल-१ निविदा धारकाच्या किमंतीपेक्षा २.३४ % जास्त किमंत सादर केली असल्याने निविदेतील १९.०(i) पात्रता निकषानुसार तो एल-१ निविदाधारकासोबत किंमत जुळवण्यासाठी पात्र ठरला व त्याने एल-१ निविदाधारकाशी किंमत जुळवण्यासाठी संमती दिली. एल-२ निविदाधारक निविदेच्या १९.०(ii)(b) पात्रता निकष (प्रतिबंधीत कार्यादेश- Restricted Order) नुसार एकूण मागणीच्या २५% कॅमेरे म्हणजेच १३ कॅमेरे पुरवठा करण्याबाबत त्यांना आदेश देण्यात आले. उर्वरीत कोणताही निविदाधारक निविदेच्या पात्रता निकषानुसार पात्र न ठरल्यामुळे एकूण फक्त २३ कॅमेरे पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले.

चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्रात वारंवार आगी लागण्याच्या घटना घडलेल्या नाही. परंतु, २०२१ मध्ये उन्हाळ्याच्या काळात संच क्र. ८ व ९ साठी कोळसा वाहून नेणाऱ्या conveyor belt ला लागलेल्या आगीच्या कारणांमध्ये belt व idler चे घर्षण तसेच इतर तांत्रिक बाबींचा समावेश असल्याची शक्यता विचारात घेऊन, घटनेस जबाबदार अधिकारी / कर्मचारी व संबंधित कंत्राटदार यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात वारंवार आगी लागण्याच्या घटना घडलेल्या नाहीत. परंतु, डिसेंबर २०२१ मध्ये संच क्र. १ ते ४ करिता कोळसा वाहून नेणाऱ्या conveyor belt ६A/ ६B ला लागलेल्या आगीच्या कारणासंबंधी मुख्यालयाद्वारे समिति स्थापन करण्यात आलेली आहे.

महानिर्मिती कंपनीतील सर्वच विद्युत केंद्रांमध्ये अग्निशमन यंत्रणा असते. सदर यंत्रणेच्या देखरेखीकरिता अग्निशमन सल्लागार आणि मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून वारंवार विविध फायर ऑडिट व सादरीकरण केले जाते. तसेच, दरवर्षी उन्हाळ्यामध्ये घ्यावयाच्या अतिदक्षतेबाबतचे परिपत्रक देखील काढुन उचीत कार्यवाही करण्यात येते. याचीच परिणती म्हणुन खापरखेडा व चंद्रपूर येथील अग्नि दुर्घटनेत कंपनीचे अतिनुकसान होण्याचे टाळता आले. मुख्य अग्निशमन सल्लागार तथा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यास महानिर्मितीची सर्व औष्णिक विद्युत केंद्रे कटिबद्ध आहेत.

महानिर्मितीच्या, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील कामे मुख्य कार्यालयाने निर्गमित केलेल्या पात्रता निकष आणि CVC मार्गदर्शक तत्वाद्वारे प्रमाणित केलेनुसार e-Tendering च्या माध्यमातून केली जातात. भांडवली स्वरूपाच्या (Capex) कामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडून (MERC) मान्यता घेतली जाते. संचलन व सुव्यवस्था संदर्भातील कामाचे निकष महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडून (MERC) मंजूर करून आवश्यकतेनुसार कामे केली जातात. तसेच, ही सर्व कामे प्रामुख्याने लेखापरीक्षण केल्यानंतर पार पाडली जातात.

******************

H1616 - 29

लक्षवेधी सूचना क्र.८५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"सौ. अनिता विलास सिंग राहणार एन-९,एच- ६१/४ श्रीकृष्ण नगर हडको एन-९ सिडको कॉलनी औरंगाबाद या दिनांक १५/०७/२०१८ रोजी दुपारच्या सुमारास घराच्या गच्चीवर कपडे वाळत घालण्यासाठी गेले असता घरावरून गेलेल्या हाय टेंशन विद्युत तारांचा स्पर्श लागून त्यांना शॉक लागणे, शॉक लागल्यानंतर त्यांनी औरंगाबाद चांगल्या दर्जाच्या रुग्णालयामध्ये उपचार घेणे, परंतु तरीसुद्धा त्यांच्या दोन्ही हात तोडावे लागल्याने त्यांना आलेले कायमचे अपंगत्व , घरावरून जाणाऱ्या विद्यूत तारांमुळे जीवित हानी होऊ नये यासाठी सदर विद्युत तारा काढण्याची वेळोवेळी मागणी करूनही औरंगाबाद विद्युत विभागाने सदर विद्युत तारा हटविल्या नसल्याने झालेल्या अपघातास ऊर्जा विभाग जबाबदार असणे, विद्युत शॉक लागल्यानंतर सौ अनिता ठेंग यांच्यावर उपचारासाठी लाखो रुपयांचा खर्च येणे, हा खर्च त्यांच्या नातेवाईकांनी कर्ज काढून केल्याने ते कर्जबाजारी होणे, त्यातच सौ ठेंग यांना आलेल्या कायमस्वरूपी अपंगत्वामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, एव्हढी गंभीर घटना होऊनही वीज वितरण कंपनीने त्यांना कोणतीही आर्थिक मदत न देणे, विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे सौ अनिता ठेंग यांना कायमचे अपंगत्व आल्याने त्यांना दोन्ही कृत्रिम हात बसविण्यासाठी ग्लोबल हॉस्पिटल मुंबई यांनी जवळपास ३५ लाखाचा खर्च सांगणे, ठेंग कुटुंबीयांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने सदर खर्च ते करू न शकणे, यामुळे विज वितरण कंपनीने अतितातडीने त्यांच्या उपचारासाठी आलेला तसेच कृत्रिम हात बसविण्यासाठी येणारा खर्च विनाविलंब देऊन त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घेऊन त्यांना झालेल्या मानसिक, शारिरीक त्रासाबद्दल नुकसान भरपाई देण्याची झालेली मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे त्यांच्या जीवन मरणाचा निर्माण झालेला ज्वलंत प्रश्न, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

सौ. अनिता विलास ठेंग, रा. एन-९, एच-६१/४ श्रीकृष्ण नगर हडको, एन-९ सिडको कॉलनी, औरंगाबाद या घरावरुन १३२/३३/३१ हरसूल अतिउच्चदाब केबलमुळे निघणारी ३३ के.व्ही. सिडको उपरी तार मार्ग जात असून, दि.१५/०७/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास घराच्या गच्चीवर कपडे वाळत घालण्यासाठी गेल्या होत्या, त्यांच्या घराचे गच्चीवरुन साधारण २.५ मीटर अंतरावर ३३ के.व्ही. सिडको वाहिनीच्या वीज वाहक तारा आहेत. सदरील ३३ के.व्ही. विद्युत वाहिनीच्या चुंबकीय परिघामध्ये सौ. अनिता विलास ठेंग यांचे हातातील ओले कपडे आल्याने त्यांना वीजेचा धक्का बसुन अप्राणांतिक अपघात घडला. व तद्नंतर त्यांचे दोन्ही हात निकामी झाले.

सदर ३३ के.व्ही. सिडको वीज वाहिनी सुमारे २० ते २५ वर्ष जुनी असुन अपघातग्रस्त महिला सौ. अनिता ठेंग राहत असलेल्या घराचे बांधकाम तद्नंतरच्या काळातील आहे. म्हणजेच पूर्वी अस्तित्वात

शासकीय योजनेचा भाग असुन घराचे मुळ बांधकामावर विना परवानगी अनधिकृतरित्या वाढीव बांधकाम केल्यामुळे संबंधित ३३ के.व्ही. वीज वाहिनीच्या विद्युत तारांचे अंतर कमी झाले. म्हणजेच सदर अनधिकृत बांधकाम करताना केंद्रीय विद्युत प्राधिकरण विनियम, २०१० (सुरक्षा आणि विद्युत पुरवठ्याशी संबंधित उपाय) मधील तरतुदींचे पालन केल्याचे आढळून येत नाही.

सदरील ३३ के.व्ही. उपरी सिडको वाहिनी वर ३३/११ के.व्ही. बायजीपूरा व ३३/११ के.व्ही. रोशनगेट, ही दोन उपकेंद्रे तसेच एमजीएम हा उच्चदाब ग्राहक जोडलेले आहेत. त्यापैकी बायजीपूरा हे उपकेंद्र संपूर्णपणे उपरी ३३ के.व्ही. लाईनवर जोडलेले आहे. ३३ के.व्ही. रोशनगेट उपकेंद्रासाठी असलेली वाहिनी ही ४.५ किमी उपरी वाहिनी असून, २.८ किमी भूमिगत वाहिनी आहे. या भूमिगत वाहिनीचा (२.८ कि.मी.) विद्युत निरीक्षक यांचे कडून प्राप्त दि.११.१२.२०१८ रोजीचे परवानगी नुसार सदरील वाहिनी दि.०५.०१.२०१९ रोजी कार्यान्वीत करण्यात आली. परंतु सदरील भूमिगत वाहिनी तांत्रिक बिघाडामुळे दि.०१.०२.२०१९ रोजी नादुरुस्त झाल्यामुळे त्या भागाचा विद्युत पुरवठा उपरी वाहिनी वरुन पूर्ववत करण्यात आला. नादुरुस्त भूमिगत वाहिनी दुरुस्त करुन दि.०५.०५.२०१९ रोजी ठिक १७.०० वा. पुन्हा कार्यान्वीत करण्यात आली. परंतु सदरील भूमिगत वाहिनी परत नादुरुस्त झाल्याने त्या भागाचा विद्युत पुरवठा उपरी वाहिनी वरुन देण्यात आला. सदरील भूमिगत वाहिनीचा बिघाड दुरुस्त केल्यानंतर भूमिगत वाहिनी भारीत करण्यात आली.

सदरील घटनेची माहिती तातडीने शाहगंज उपविभागीय कार्यालयामार्फत विद्युत निरिक्षक कार्यालय, औरंगाबाद यांना कळविण्यात आली. विद्युत निरिक्षक यांनी त्यांच्या दि.०३.१०.२०१८ पत्रान्वये, सदर अपघातास महावितरण कंपनीस जबाबदार धरुन आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे आदेशित केले. सौ. अनिता विलास ठेंग यांचे नातेवाईक श्री. विलास हरीश ठेंग यांना महावितरण कंपनी मार्फत तातडीची मदत रु.५०००/- दि.३१/०७/२०१८ रोजी अदा केलेली आहे. महावितरणचे नियमानुसार नुकसान भरपाईची प्रक्रीया कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

सदर अप्राणांतीक अपघातास महावितरण कंपनीचे परिपत्रक दि.२०.११.२००८ व सुधारीत परिपत्रक दि.२२.०३.२०११ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत अपंगत्वाचे वैद्यकीय अहवालानुसार १०० टक्के अपंगत्वास रुपये २.५ लक्ष नुकसान भरपाई देण्याबाबतची तरतूद आहे. शंभर टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्वास संबंधिताचे उत्पन्न क्षमतेनुसार व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रमाणित केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार नुकसान भरपाई देण्यात येते. सदर प्रकरणी संबंधितांकडून नुकसान भरपाई मिळणेबाबतचा अर्ज, आवश्यक कागदपत्रे जसे की जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र, इ. कागदपत्रांच्या पुर्ततेअंती नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची कार्यवाही नियोजित आहे.

सदरील ठिकाणी परत अपघात होऊ नये यासाठी ३३ के.व्ही. लाईन मध्ये एक पोल उभा करुन वाहिनीची उंची वाढविली आहे. तसेच सदर प्रकारच्या अपघाताची पुनरावृत्ती टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर सर्वेक्षण करून विद्युत वाहिन्यांच्या जवळ अनधिकृतपणे उभारलेल्या किंवा बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी नोटीस देवून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना महावितरण कंपनीस देण्यात आल्या आहेत.

*************************